

# आपली मुंबई



म. ग्रं. सं. ठाणे
REFBK-0005023

किंमत २॥ आणे

ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
ग्रं. क्र.
ता.



राजाबाई टावर वरून दिसणारा मुंबईचा देखावा.

## मुलांमुलींच्या दुसऱ्या इयत्तेकरितां

# आपली मुंबई

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६६५५
ठाणे

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं.भू.प्रवास नं. १३७
ता. ३०-१२-३३
ठाणे

लेखक

शंकर ... ास्तर,
ठा ... ळा

REFBK-0005023

ग्रंथ संग्रहालय
क्र. 5023

प्रकाशक,
केशव भिकाजी ढवळे, गिरगांव, मुंबई.

आवृत्ति २ री ] किंमत अडीच आणे [ सन १९३३

मुद्रक—**एस्. व्ही. परुळेकर,** मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंटस् ऑफ इंडिया
सोसायटी बिल्डिंग, सँढर्स्टरोड, गिरगांव–मुंबई.

प्रकाशक—**केशव भिकाजी ढवळे,** (रामचंद्र बिल्डिंग) गिरगांव–मुंबई

( सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत. )

# प्रस्तावना

**मुं**बईच्या प्राथमिक शाळांतून चालणाऱ्या अभ्यासक्रमांत **अलीकडे झालेल्या फेरफाराप्रमाणें** दुसऱ्या इयत्तेसाठीं '**भूगोल**' हा **विषय नवीनच नेमलेला आहे.** दुसऱ्या इयत्तेच्या मुलांमुलींना उपयुक्त असें **भूगोलाचें पुस्तक नसल्यामुळें** त्या अभ्यासक्रमाला धरून "**आपली मुंबई**" या नांवाचें पुस्तक लिहिलें आहे.

या पुस्तकांत प्रथम दिशांची माहिती देऊन नंतर मुंबईंत पुष्कळ लोक कां राहतात? त्यांची रहाणी, धंदे, रस्ते व वाहनें यांची माहिती देऊन वर्गाच्या खोलीचा नकाशा काढण्याची माहिती सांगून, ट्रॅम, मोटारबस व रेल्वे यांची जरूर ती माहिती दिली आहे. शेवटीं सफरींच्या रूपानें मुंबई बेटाचें वर्णन मनोरंजक होईल अशा सोप्या भाषेंत लिहिलें आहे.

राजाबाई टॉवरचें व त्यावरून दिसणाऱ्या देखाव्याचें चित्र देऊन ट्रॅम, मोटारबस, म्युझियम व चाळीचें चित्र इत्यादि चित्रें देऊन आणखी विशेष शब्दांच्या अर्थाची समजूत देणारा नकाशा १ व मुंबई बेटाचे २ असे ३ नकाशे दिले आहेत.

सदर चित्रें व नकाशे यांस फार खर्च झाला, पण **केवळ उपयुक्ततेकडे लक्ष देऊन पुस्तकाची किंमत फार अल्प ठेविली आहे.**

शाळांतील मुलांमुलींना सफरीस नेण्यासाठीं हल्लीं स्कूल्स कमिटीनें मोटारबसेस ठेविल्या आहेत. त्यांचा उपयोग करून घेऊन प्रत्यक्ष सफर करतांना वर्णनाचे अनुरोधानें माहिती देत गेल्यास मुलांमुलींस करमणूक होऊन त्यांचें ज्ञान पक्कें होईल. अशी मला खात्री वाटते.

## आवृत्ति दुसरी

**या** आवृत्तींत मुंबई बेटांतील पाहण्यासारखीं स्थळें जास्त देऊन शिवाय गिरणी काढण्यास लागणाऱ्या गोष्टींचा विस्तृत खुलासा केला आहे, या आवृत्तीचे वेळींही माझे मित्र श्रीयुत–वामन रामकृष्ण जोशी, शिक्षक पोईबावडी स्कूल यांनीं आपला अमूल्य वेळ खर्च करून आपलेपणानें मला वेळोवेळीं जी मदत केली तीबद्दल मीं त्यांचा फार आभारी आहें.

आपला,

**शंकर केशव आठवले**

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ ला— | दिशा ... ... ... ... ... | ५ |
| २ रा— | दिशा (पुढें चालू) ... ... ... | ६ |
| ३ रा— | मुंबईंत पुष्कळ लोक कां राहतात? ... ... | ८ |
| ४ था— | लोकांची रहाणी वगैरे ... ... ... | ९ |
| ५ वा— | धंदे ... ... ... ... ... | ११ |
| ६ वा— | रस्ते व वहानें ... ... ... ... | १४ |
| ७ वा— | पाहाण्यासारखीं स्थळें ... ... ... | २४ |
| ८ वा— | नकाशा ... ... ... ... ... | २७ |
| ९ वा— | मुंबईची व्यवस्था ... ... ... | ३० |
| १० वा— | सफर १ ली, ठाकुरद्वार ते क्राफर्ड मार्केट ... | ३२ |
| ११ वा— | सफर २ री, ठाकुरद्वार रोडपासून पूर्व बाजूनें क्राफर्ड मार्केटपर्यंत ... ... ... ... ... | ३५ |
| १२ वा— | सफर ३ री, ठाकुरद्वार रोडपासून पश्चिम बाजूनें क्राफर्ड मार्केटपर्यंत ... ... ... ... | ३७ |
| १३ वा— | सफर ४ थी, ठाकुरद्वारपासून लालबाग पर्यंत | ३९ |
| १४ वा— | सफर ५ वी, धोबीतलावापासून राणीचे बागेपर्यंत | ४१ |
| १५ वा— | सफर ६ वी, लालबाग पासून टिळक पुलावरून किंग्ज् सर्कल ... ... ... ... | ४३ |
| | विशेष शब्दांच्या अर्थांची समजूत ... | ४५ |


## चित्रांची यादी



| | चित्रांची यादी | पृष्ठ |
| --- | --- | --- |
| १ | राजाबाई टॉवरवरून दिसणारा मुंबईचा देखावा | १ |
| २ | चाळीचें चित्र ... ... ... ... ... | १० |
| ३ | रेल्वे व ट्रॅमचा नकाशा ... ... ... | १६ |
| ४ | ट्रॅमचें चित्र ... ... ... ... ... | १९ |
| ५ | मोटारबसचें चित्र ... ... ... ... | २१ |
| ६ | वार्ड व पाहाण्यासारखीं स्थळें, नकाशा ... ... | २२ |
| ७ | म्युझियम ... ... ... ... ... | २५ |
| ८ | राजाबाई टॉवर ... ... ... ... | २६ |
| ९ | वर्गाच्या खोलीचा नकाशा ... ... ... | २९ |
| १० | विशेष शब्दांच्या अर्थांची समजूत. नकाशा ... | ४८ |

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
नोंद नं. ६००५५
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्थळ प्रत
ता. ३०-१२-३

# आपली मुंबई

## पाठ १ ला

### दिशा




मुलांनो, तुम्ही कवाईत करितां त्यावेळीं ड्रीलमास्तर तुम्हांला सांगतात कीं, “ उजवी बाजू वळा. ” “डावी बाजू वळा.” त्यावेळीं तुम्हीं काय करितां? नीट समोर उभे रहा. उजवी बाजू वळा पाहूं. तसेंच डावी बाजू वळा पाहूं. माझ्यासमोर तोंड करा. किती वेळां उजवी बाजू वळलें असतां पुन्हां माझ्यासमोर तुमचें तोंड येईल? तुमचें तोंड कोणत्या बाजूला आहे? हें घड्याळ तुमच्या कोणत्या बाजूला आहे? “ उजवे बाजूला ” ही राजाची तसबीर तुमच्या कोणत्या बाजूला आहे. ‘ डावे बाजूला ’. माझें तोंड तुमच्या कोणत्या बाजूला आहे? हें घड्याळ माझे कोणत्या बाजूला आहे? ‘ डावे बाजूला ’ तुम्हीं म्हणतां राजाची तसबीर

डावे बाजूला आहे. व मी म्हणतों कीं, उजवे बाजूला आहे. एकादा मुलगा घड्याळाकडे तोंड करून उभा राहिला तर तो म्हणेल " घड्याळ माझे समोर आहे. राजाची तसबीर माझे पाठीमागें आहे. " याप्रमाणें प्रत्येकजण निरनिराळें म्हणेल.

सूर्य कोणत्या बाजूला उगवतो तें हातानें दाखवा, ह्या बाजूला उगवत किंवा पूर्व म्हणतात. सूर्य नेहमीं पूर्वेसच उगवतो. केव्हांही चुकत नाहीं. आतां सूर्य उगवतो त्या बाजूकडे म्हणजे पूर्वेकडे तोंड करा. आतां तो ज्या बाजूस मावळतो त्या बाजूकडे तोंड करा. हिला मावळत किंवा पश्चिम म्हणतात. पुन्हा पूर्वेकडे तोंड करा. आतां तुमची उजवी बाजू दाखवा पाहूं. हिला दक्षिण म्हणतात. डावी बाजू दाखवा पाहूं हिला उत्तर म्हणतात. बाजूलाच दिशा म्हणतात.

मग सांगा पाहूं दिशा किती आहेत ? पूर्व दिशा कशी ओळखावी ? आतां हें घड्याळ कोणत्या दिशेकडे आहे तें सांगा पाहूं. तेंच घड्याळ मीही म्हणेन दक्षिणेस आहे. ही राजाची तसबीर कोणत्या दिशेला आहे ? हें कुत्र्याचें चित्र कोणत्या दिशेला आहे ? हें समोरचें घर कोणत्या दिशेला आहे ? आपल्या वर्गाचा दरवाजा कोणत्या दिशेला आहे ? पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर या दिशांना मुख्य दिशा म्हणतात. मुख्य दिशा चार आहेत.

# पाठ २ रा

## दिशा ( पुढें चालू )

मागील पाठांत तुम्ही मुख्य दिशा शिकलां आहां. आतां आणखी कांहीं दिशा आहेत कीं काय तें पाहूं. एक मुलगा गडबड करीत होता. त्यास मास्तरांनीं कोपऱ्यांत उभें केलें होतें.

मास्तरांनीं विचारिलें, हा मुलगा कोणत्या दिशेस उभा आहे? एक मुलगा म्हणाला, ‘ पूर्वेस ’ दुसरा मुलगा म्हणाला, ‘ नाहीं, तो दक्षिणेस आहे. तिसरा म्हणाला, ‘ नाहीं, नाहीं. ’ तो पूर्वेस नाहीं व दक्षिणेसही नाहीं. तो दोहोंच्या कोपऱ्यांत आहे. मास्तर म्हणाले, बरोबर आहे. असे कोंपरे किती आहेत ? दाखवा पाहूं. या कोपऱ्यांतील मुलाकडे तोंड करा. कोणत्या मुख्य दिशा जवळ जवळ आहेत ? पूर्व व दक्षिण. या दोन मुख्य दिशांमधील कोपऱ्यांत हा मुलगा उभा आहे. या कोपऱ्याला नांव आहे. पण अगोदर बाकीचे कोपरे कोणकोणत्या मुख्य दिशांमध्यें आहेत तें सांगा म्हणजे मग त्या कोपऱ्यांचीं मी तुम्हांला नांवें सांगेन.

गोविंदा म्हणाला, “दक्षिण व पश्चिम या दिशांमधील एक कोंपरा.” वसंत म्हणाला, “ मी एक सांगतों पश्चिम व उत्तर या दिशांमधील एक कोंपरा.” मास्तर म्हणाले, “तीन कोंपरे झाले आतां चौथा कोण सांगतो ”? लगेच धोंडू म्हणाला, “उत्तर व पूर्व यांमधील कोंपरा,” मास्तर म्हणाले, “ थांबा. आतां मी या कोपऱ्यांचीं नांवें सांगतों. हा मुलगा पूर्व व दक्षिण यांमधील कोंपऱ्यांत उभा आहे. त्या कोपऱ्याच्या बाजूला ‘ आग्नेय ’ दिशा म्हणतात. दक्षिण व पश्चिम यांमधील कोंपऱ्यास ‘ नैर्ऋत्य ’ दिशा म्हणतात. पश्चिम व उत्तर यांमधील कोंपऱ्यास ‘ वायव्य ’ दिशा म्हणतात व उत्तर आणि पूर्व यांमधील कोंपऱ्यास ‘ ईशान्य ’ दिशा म्हणतात, आज आपण ज्या दिशा शिकलों त्यांस पोटदिशा म्हणतात. त्या किती आहेत ? चार आहेत. त्यांचीं नांवें सांगा पाहूं. आग्नेय, नैर्ऋत्य वायव्य व ईशान्य.

# पाठ ३ रा

## मुंबईंत पुष्कळ लोक कां रहातात ?

मुलांनो, तुमचा गांव कोणता ? त्या गांवांत किती माणसें दिसतात व मुंबईंत किती दिसतात ? असें कां असावें बरें ? तुम्ही ज्याप्रमाणें गांवाहून आलां तसेच इतर लोक आले असतील. आपण पाहूं या हे कशाला आले आहेत ते.

सकाळीं ६॥ वाजले. चला. पहा ही गंमत. गिरण्यांचे भुंगे वाजले. लोक चाळींतून भराभर घराबाहेर पडले व रस्त्यानें जाऊं लागले. हे जातात कोठें ? गिरण्यांत. हे सगळे लोक तुमच्या सारखेच गांवाहून येथें आले आहेत. त्यांना गिरण्यांत नोकरी आहे. गिरणीचा भुंगा ही कामावर येण्याची सूचना आहे. असे गिरणींत काम करणारे या मुंबईंत सुमारें १। लाख लोक आहेत. हे लोक गरीब असल्यामुळें त्यांना फारसें शिक्षण घेतां आलें नाहीं. आतां सुमारें ९॥-१० वाजले. आगगाडीचे स्टेशनावर चला. पहा थोडथोड्या वेळानें एकामागून एक गाड्या येत आहेत. कोण ही गर्दी ! आंत शिरायलासुद्धां जागा नाहीं. हे सगळे लोक चालले कोठें ? गिरणींत काम करणाऱ्या लोकांहून यांचा पोशाख वेगळा दिसतो. हे सगळे लोक वेगवेगळ्या कचेऱ्यांत नोकरीवर चालले आहेत. दुपारीं कचेरींत जाणारांची जशी गर्दी असते तशीच संध्याकाळीं परत येणारांची असते. हे लोक शिकलेले आहेत.

याचवेळीं या ट्रॅमगाड्यांकडे पाहा. गाड्या भराभर येत आहेत. कांहीं माणसें मागचे बाजूनें ट्रॅममध्यें बसण्यासाठीं चढत आहेत.

व कांहीं पुढचे बाजूनें उतरत आहेत. ( ट्रॅममध्यें मागचे बाजूनें पुरुषांनीं चढावें व स्त्रियांनीं पुढचे बाजूनें चढावें व उतरतांना सर्वांनीं पुढचेच बाजूनें उतरावें असा ट्रॅम कंपनीचा नियम आहे.) कोण गर्दी ही ! हे लोकही कचेऱ्यांतच निघाले.

याप्रमाणेंच वेगवेगळ्या कामाकरितां मुंबईत लोक आले आहेत. त्यांचें मूळचें गांव कांहीं मुंबई नव्हे.

हे लोक कसे राहतात ? काय करतात ? यांची माहिती आपण पुढें करून घेऊं.

---

## पाठ ४ था

### लोकांची राहाणी वगैरे

आपल्या गांवांत बहुधा प्रत्येक कुटुंबाचें घर वेगवेगळें असतें. घरासभोंवतीं थोडी फार जागा व बाग असते. पण मुंबईत तसें आहे का ? या आपल्या चाळींत कितीतरी कुटुंबें राहतात ! बैठीचाळ असून जागा पुरत नाहीं म्हणून चार चार पांच पांच मजली उंच चाळी केल्या आहेत. प्रत्येक मजल्यावर खोल्या केल्या आहेत त्या लहानशा खोल्यांत कितीतरी माणसें राहातात. खोलीला १५।२० रु. भाडें पडतें. इतकें भाडें गरीब लोक कोठून देणार ? म्हणून गरीब लोकांच्या सोईसाठीं सरकारनें सिमेंटच्या चाळी बांधून ६।७ रुपये भाडें ठेविलें आहे. अशा पुष्कळ चाळी मुंबईत आहेत. मग मुंबईत घरें नाहींतच कीं काय ? मुंबईत श्रीमंत लोक आहेत ते मोठमोठ्या छानदार घरांत राहातात. त्यांना बंगले असें म्हणतात. तुम्हीं वाळकेश्वर, महालक्ष्मीचा भाग पहातांना तिकडे तुम्हांला पुष्कळ बंगले दिसतील.

२

# पाठ ३ रा

## मुंबईंत पुष्कळ लोक कां रहातात ?

मुलांनो, तुमचा गांव कोणता ? त्या गांवांत किती माणसें दिसतात व मुंबईंत किती दिसतात ? असें कां असावें बरें ? तुम्ही ज्याप्रमाणें गांवाहून आलां तसेच इतर लोक आले असतील. आपण पाहूं या हे कशाला आले आहेत ते.

सकाळीं ६॥ वाजले. चला. पहा ही गंमत. गिरण्यांचे भुंगे वाजले. लोक चाळींतून भराभर घराबाहेर पडले व रस्त्यानें जाऊं लागले. हे जातात कोठें ? गिरण्यांत. हे सगळे लोक तुमच्या सारखेच गांवाहून येथें आले आहेत. त्यांना गिरण्यांत नोकरी आहे. गिरणीचा भुंगा ही कामावर येण्याची सूचना आहे. असे गिरणींत काम करणारे या मुंबईंत सुमारें १। लाख लोक आहेत. हे लोक गरीब असल्यामुळें त्यांना फारसें शिक्षण घेतां आलें नाहीं. आतां सुमारें ९॥-१० वाजले. आगगाडीचे स्टेशनावर चला. पहा थोडथोड्या वेळानें एकामागून एक गाड्या येत आहेत. कोण ही गर्दी ! आंत शिरायलासुद्धां जागा नाहीं. हे सगळे लोक चालले कोठें ? गिरणींत काम करणाऱ्या लोकांहून यांचा पोशाख वेगळा दिसतो. हे सगळे लोक वेगवेगळ्या कचेऱ्यांत नोकरीवर चालले आहेत. दुपारीं कचेरींत जाणारांची जशी गर्दी असते तशीच संध्याकाळीं परत येणारांची असते. हे लोक शिकलेले आहेत.

याचवेळीं या ट्रॅमगाड्यांकडे पाहा. गाड्या भराभर येत आहेत. कांहीं माणसें मागचे बाजूनें ट्रॅममध्यें बसण्यासाठीं चढत आहेत.

व कांहीं पुढचे बाजूनें उतरत आहेत. ( ट्रॅममध्यें मागचे बाजूनें पुरुषांनीं चढावें व स्त्रियांनीं पुढचे बाजूनें चढावें व उतरतांना सर्वांनीं पुढचेच बाजूनें उतरावें असा ट्रॅम कंपनीचा नियम आहे.) कोण गर्दी ही ! हे लोकही कचेऱ्यांतच निघाले.

याप्रमाणेंच वेगवेगळया कामाकरितां मुंबईत लोक आले आहेत. त्यांचें मूळचें गांव कांहीं मुंबई नव्हे.

हे लोक कसे राहतात ? काय करतात ? यांची माहिती आपण पुढें करून घेऊं.


---

## पाठ ४ था

### लोकांची राहाणी वगैरे

आपल्या गांवांत बहुधा प्रत्येक कुटुंबाचें घर वेगवेगळें असतें. घरासभोंवतीं थोडी फार जागा व बाग असते. पण मुंबईत तसें आहे का ? या आपल्या चाळींत कितीतरी कुटुंबें राहतात ! बैठीचाळ असून जागा पुरत नाहीं म्हणून चार चार पांच पांच मजली उंच चाळी केल्या आहेत. प्रत्येक मजल्यावर खोल्या केल्या आहेत त्या लहानशा खोल्यांत कितीतरी माणसें राहातात. खोलीला १५।२० रु. भाडें पडतें. इतकें भाडें गरीब लोक कोठून देणार ? म्हणून गरीब लोकांच्या सोईसाठीं सरकारनें सिमेंटच्या चाळी बांधून ६।७ रुपये भाडें ठेविलें आहे. अशा पुष्कळ चाळी मुंबईत आहेत. मग मुंबईत घरें नाहींतच कीं काय ? मुंबईत श्रीमंत लोक आहेत ते मोठमोठ्या छानदार घरांत राहातात. त्यांना बंगले असें म्हणतात. तुम्हीं वाळकेश्वर, महालक्ष्मीचा भाग पहातांना तिकडे तुम्हांला पुष्कळ बंगले दिसतील.

मुंबईत अशा रीतीनें राहावें लागतें. त्यामुळें त्यांना वेगवेगळ्या सोई कराव्या लागल्या आहेत. आपण चाळींत वरचे मजल्यावर राहातों. तेथें आपणांस पाणी मिळण्याची सोय कशी केली आहे



हे पहा, चाळीचें चित्र.

पहा. मुंबई बेटांत विहिरी नाहींत. थोड्याशा आहेत पण त्यांचें पाणी वाईट असतें. त्या बंद केलेल्या आहेत. मुंबई बेटाबाहेर ठाणें जिल्ह्यांत तुळशी, तानसा आणि विहाड असे तीन तलाव आहेत.

स्थळ प्रत ९३८
नं. भू. प्रवासनं.
ता. ३०-१२-३३

त्यांचें पाणी मोठमोठ्या नळांनीं आणून मुंबईंत सांठवून ठेविलें आहे. अशाप्रकारचा एक सांठा मलबार हिलवर मोठा तलाव बांधून केलेला आहे, तो चांगला बंद करून त्यावर माती वगैरे टाकून तेथें बाग केली आहे. त्या बागेंत लोकांना बसण्यासाठीं बांकें वगैरे ठेविलेलीं आहेत. हिला हँगिंग् गार्डन ( सर फिरोज शहा मेथा गार्डन ) म्हणतात. सकाळ संध्याकाळ तेथें कितीतरी लोक फिरावयास जातात. त्या तलावाला नळ लावून प्रत्येक चाळींत व प्रत्येक बंगल्यांत पाणी नळानें सोडलेलें आहे.

खोलीच्या मोरींतील, नळावरील धुण्याचें वगैरे घाणेरडें पाणी, तसेंच संडास व मुत्र्यांतील घाण पाणी एका मोठ्या लोखंडी नळानें लहानशा गटारांत सोडलेलें असतें तें लहानसें गटार मोठ्या गटाराला जोडलेलें असतें, हीं सर्व लहान मोठीं गटारें जमिनींत बांधून बंद केलेलीं असतात. अशा तऱ्हेनें सर्व घाणेरडें पाणी मोठ्या गटारांत येऊन तें समुद्रांत सोडलेलें असतें.

शहरांत लोकवस्ती फार असल्यामुळें केरकचरा फार होतो. रस्ते झाडून स्वच्छ करण्याकरितां झाडूवाले ठेविलेले आहेत. हा सर्व कचरा शहराबाहेर नेऊन टाकण्याची व्यवस्था केलेली आहे. या व्यवस्थेनें रोगराई वगैर होत नाहीं.

तुमचे गांवांत तुम्हांला दूध कोठून मिळतें ? बहुतेक लोक गुरें बाळगतात. पण मुंबईंत गुरें वाटेल तेथें बाळगावयास परवानगी नाहीं. मग येथें दूध कसें मिळतें ? मुंबईचे कांहीं भागांत तबेले आहेत. त्यांत बहुतेक भय्येलोक म्हशी बाळगतात. त्यांचें दूध काढून ते ठिकठिकाणीं नेऊन घालतात. याशिवाय मुंबईचे बाहेर वसई, कल्याण वगैरे इतर गांवीं लोक म्हशी बाळगून दूध मुंबईस आणितात. त्यांच्या राहाण्याच्या वसई या मुख्य गांवामुळें त्यांना ‘ वसईवाले ’ असें नांव पडलें आहे.

ग्रंथालय
नों. नं. ६५५५

येथें भाजीपाला कसा मिळतो ? आपले चाळीचे आजू बाजूस भाजीपाला करण्यास तर जागा नाहीं. मग काय येथें भाजीपाला मिळतच नाहीं ? छे ! इतर गांवांपेक्षां येथें तर जास्तच भाजीपाला मिळतो. मुंबईबाहेरचे लोक दुधाप्रमाणें भाजीपाला तयार करून तो मुंबईस पाठवितात. मुंबईस खप पुष्कळ होतो व त्यांना चांगले पैसे मिळतात.

धान्य मुंबईत पिकतें का ? नाहीं. कां बरें ! मुंबईस तर जिकडे तिकडे घरेंच आहेत. येथें शेतें पिकवावयास जागा आहे कोठें ? मग येथें धान्य कसें मिळतें ? आगगाड्या व गलबतें यांनीं इतर ठिकाणांहून पुष्कळ धान्य येथें येतें व तें आपणांस मिळतें.

कापड तर येथेंच गिरण्यांत होतें. शिवाय दुसऱ्या देशांतूनहीं कापड येथें येतें.

या शिवाय औषधें, खेळणीं वगैरे दुसऱ्या अनेक वस्तू येथें होतात आणि परदेशांतूनही येतात व त्या आपणांस मिळतात.

## पाठ ५ वा

### धंदे

मागील पाठांत लोक गिरण्यांत जातात, कचेरींत जातात असें आपण पाहिलें पण तेथें ते कशाकरितां जातात ? पैसे मिळविण्याकरितां. पैसे मिळविण्याकरितां रोज जें काम करावें लागतें त्यास ‘धंदा’ असें म्हणतात. कांहीं लोक नोकरीचा धंदा करितात व पैसे मिळवितात. पण पैसे कशाकरितां? पोटाला अन्न मिळावें म्हणून. कांहीं लोक धान्याचीं दुकानें घालतात त्यास ‘दाणेवाला’ म्हणतात. दाणेवाले मोठ्या प्रमाणावर दाणेबाजारांत धान्य खरेदी करून किरकोळीनें विकतात व पैसे मिळवितात.

दाणेवाल्याजवळ धान्य असून ते पैसे कां मिळवितात ? त्यांना कापड वगैरे दुसऱ्या वस्तू पाहिजेत म्हणून. ठिकठिकाणीं कापडाचीं दुकानें आहेत त्यांत कापड मिळतें. कापडाचे व्यापारी निरनिराळ्या तऱ्हेचें कापड मुळजीजेठा, मंगळदास, लखमीदास तेरसी, गोकुळदास मुरारजी या मार्केटांतून खरेदी करतात व फायदा घेऊन विकतात. अशा तऱ्हेनें निरनिराळे धंदे करून पैसे मिळविणारे लोक मुंबई शहरांत आहेत ते कोणते हें पाहूं.

मुंबईत कापसाच्या गिरण्या पुष्कळ आहेत हें मागें सांगितलें आहेच. कापसाची गिरणी काढावयाची म्हणजे कापूस पाहिजेच. मुंबईत तर कापूस पिकत नाहीं. गिरणी काढण्यास आणखी कोणत्या गोष्टींची जरूरी असते. दगडी कोळसा अगर वीज, पैसा, पाणी व दळणवळणाचीं साधनें. या सर्व गोष्टी मुंबईस अनुकूल आहेत कारण मुंबईत कापूस जरी पिकत नाहीं तरी रेल्वेनें व आगबोटीनें खानदेश, गुजराथ वगैरे भागांत पिकणारा कापूस येथें आणतां येतो. तसेंच मुंबई बंदरांत विलायतच्या बोटी लागत असल्यामुळें येथें दगडी कोळसा स्वस्त मिळतो, येथें मोठेमोठे श्रीमंत धाडसी व्यापारी आहेत, पाण्याची सोय फार उत्तम आहे. गिरण्यांतून तयार होणारा माल दुसरीकडे पाठविण्यास रेल्वे, आगबोटी, गलबतें यांची सोय आहे.

कांहीं लोक सोन्याचांदीचा व्यापार करितात. मोठ्या प्रमाणावर सोनें, चांदी, हिरे, मोतीं, माणकें वगैरे घेणें असेल तर मोतीबाजारांत गेलें पाहिजे. मोतीबाजार मुंबादेवीजवळ आहे.

तांब्या पितळेचीं भांडीं करणारे लोकांस ‘ तांबट ’ किंवा ‘ कासार ’ म्हणतात. या भांड्यांचीं दुकानें शहरांत बहुतेक ठिकाणीं आहेत परंतु मोठीं दुकानें भुलेश्वराजवळ आहेत त्यास ‘ तांबाकांटा ’ म्हणतात.

कोळी कोणाला म्हणतात ? त्यांचा धंदा कोणता ? मासे कोठें राहातात ? समुद्रकांठीं मासे मारण्याचा धंदा चालतो म्हणून कोळी लोक चौपाटी, कुलाबा, माहीम, वरळी येथें आहेत.

भात भाजी यांना चव येण्याकरितां कोणता पदार्थ अवश्य आहे ? मीठ. मीठ कसें तयार करितात ? वडाळा येथें मिठागरें आहेत तेथें मीठ पिकवितात.

चामड्याचे कारखाने धारावी येथें आहेत. तेथें चामड्याच्या वस्तू करणारे लोक आहेत.

भाजीपाल्याचा धंदा करणारे लोक पुष्कळ आहेत. भाजीपाल्याचीं मार्केटें ठिकठिकाणीं आहेत. त्यांपैकीं भायखळा, क्राफर्ड मार्केट, भुलेश्वर, नळबाजार हीं मोठीं आहेत.

याशिवाय फेरीवाले, कल्हईवाले, सुतार, गंवडी वगैरे निरनिराळ्या धंद्यांचे लोक आपापले धंदे करून पैसे मिळवितात.

## पाठ ६ वा

### दळणवळणाचीं साधनें

ज्या वेळीं तुम्हीं कांहीं कामाकरितां अगर कोणास भेटण्याकरितां किंवा शाळेंत जाण्याकरितां घराबाहेर पडतां तेव्हां कसे जातां ? मुंबईतील रस्ते व खेडेगांवांतील रस्ते यांत काय फरक दिसतो ? मुंबईचे रस्ते असे मोठे करण्याचें कारण काय असावें बरें ? मुंबईत लोकवस्ती फार आहे, गाडीघोड्यांची गर्दीही फार असल्यामुळें रस्ते चांगले रुंद व सपाट केलेले आहेत.


पूर्वीचे साधे रस्ते वांकडे तिकडे होते परंतु हल्लीं शहरांत शुद्ध हवा नीट खेळावी म्हणून रस्ते पूर्व पश्चिम सरळ करीत आहेत.

असे रस्ते असल्यामुळें समुद्रावरून जी हवा वाहात येते ती फक्त समुद्राजवळच्याच भागांस न मिळतां सर्व भागांस मिळते. तसेंच रस्त्यावर फार धुरळा होऊं नये म्हणून खडींचे व डामराचे रस्ते केलेले आहेत. रस्त्यावर फार धूळ होते ती उडूं नये म्हणून पाणी शिंपण्याची व्यवस्था केलेली आहे. या सर्व रस्त्यांवर पूर्वी राकेलचे दिवे होते, परंतु त्या योगानें हवा बिघडत असल्यामुळें हल्लीं त्या ऐवजीं ग्यासचे व विजेचे दिवे केले आहेत. तसेंच रस्त्यांस शोभा येण्यास व जाणाऱ्या येणाऱ्यांस सावली मिळावी म्हणून झाडें लाविलीं आहेत.

आतां आपण एखाद्या मोठ्या नाक्यावर उभे राहूं. कांहीं लोक पायानें जातांना दिसतील, कांहीं लोक व्हिक्टोरियांत ( घोड्याची गाडी ) बसून जातांना दिसतील. कांहीं मोटारींतून जातांना आढळतील. कांहीं ट्रॅममधून, कांहीं मोटारबस मधून व कांहीं सायकलवर बसून जातांना दिसतील. मोटारीकडे जरा बारकाईनें पाहा. कांहीं मोटारी खासगी असतात व कांहीं भाड्याच्या असतात. भाड्याच्या मोटारींना ‘ टॅक्सी ’ म्हणतात. टॅक्सींना एक प्रकारचें यंत्र असतें त्यावरून भाड्याचे पैसे समजतात. त्या यंत्राला ‘ मीटर ’ म्हणतात.

मुंबईत कोठें जावयाचें असेल तर कोणतीं साधनें आहेत ? पण मुंबईच्या बाहेर अगदीं थोडक्या पैशांत जाणें असेल तर कसें जावें ? मुंबईतून कांहीं आगगाडीचे रस्ते निघाले आहेत, ते कोणते तें पाहूं.

( १ ) बॉम्बे बडोदा ॲण्ड सेंट्रल इंडिया रेल्वे ( बी. बी. ॲण्ड सी. आय. ) चर्चगेटपासून निघते. ह्या रेल्वेच्या दिल्लीकडे जाणाऱ्या गाड्या ‘ बॉम्बे सेंट्रल ’ मधून सुटतात. शहरांत व शहराच्या जवळच्याच भागांत जाणाऱ्या कांहीं गाड्या आहेत त्यांस


बांद्रा
शीव
माहीम
माटुंगा
दादर
माटुंगा
दादर
एल्फिन्स्टनरोड
लोअर परळ
करीरोड
चिंचपोकळी
महालक्ष्मी
भायखळा
ग्रँटरोड
चर्नीरोड
मरीन लाइन्स
चर्चगेट
कुलाबा
उत्तर
पश्चिम
पूर्व
दक्षिण
१ मैल
मुंबई बेट.
रेल्वे.

'लोकल' गाड्या म्हणतात. ह्या लोकल गाड्या 'चर्चगेट' स्टेशनापासून निघतात. चर्चगेटमध्यें आपण आगगाडींत बसलों तर मरीनलाइन्स, चर्निरोड, ग्रँटरोड, बॉम्बे सेंट्रल, महालक्ष्मी, लोअर परळ, एल्फिन्स्टन रोड, दादर, माटुंगा, माहीम हीं मुंबईतील स्टेशनें लागतील. माहीम स्टेशनावरून ही रेल्वे पुढें ठाणें जिल्ह्यांत गेली आहे. या रेल्वेचा परळ येथें एन्जिनें व आगगाडीचे डबे दुरुस्त करण्याचा मोठा कारखाना आहे.

जर आपणाला पुण्यास जावयाचें असेल तर कोणत्या स्टेशनावर गेलें पाहिजे? बोरीबंदर स्टेशनावर. त्यालाच व्हिक्टोरिया टरमिनस म्हणतात. येथून ग्रेट इंडियन पेनिन्सुला रेल्वे ( जी. आय्. पी. ) निघते. तिच्याही लोकल गाड्या आहेत. लांबच्या गाड्या व लोकल गाड्या बोरीबंदरपासून सुटतात. आपण एकाद्या लोकल गाडींत बसून गेलों तर मशीद, सॅन्डहर्स्ट-रोड, भायखळा, चिंचपुकळी, करीरोड, परळ, दादर, माटुंगा व शींव हीं स्टेशनें लागतील.

जी. आय. पी. रेल्वेच्या गाड्या दुरुस्त करण्याचा कारखाना माटुंगा येथें आहे. व एन्जिनें नीट करण्याचा कारखाना— परळ येथें आहे.

हारबर ब्रॅन्च—ही बोरीबंदर पासून निघून मशीद, सॅन्डहर्स्ट-रोड स्टेशन जवळ आल्यावर एका मोठ्या पुलावर चढते व तेथून डॉकयार्डरोड, रे रोड, कॉटनग्रीन, शिवडी, गोवारी, माहीम [ बी. बी. रेल्वे ] स्टेशनावरून वांद्र्यापर्यंत गेली आहे. गोवारी पासून तिचा एक फांटा कोळीवाडा स्टेशनवरून कुर्ला स्टेशन जवळ जी. आय. पी. रेल्वेच्या मुख्य रस्त्यास मिळतो.

मुंबईतून दुसऱ्या लांबच्या गांवीं जाण्यास जसा आगगाडीचा अगर मोटारींचा उपयोग होतो त्याप्रमाणेंच आगबोटींचा बराच उपयोग होतो. विलायतच्या बोटी बेलार्डपिअर व अलेक्झांड्रा

डॉकमधून सुटतात. कराची किंवा कारवारकडे जाणाऱ्या बोटी प्रिन्सेसडॉकवरून सुटतात. कोंकण, गोंवे या भागाकडे जाणाऱ्या बोटी अलेक्झांड्रा डॉकच्या बाहेरील धक्यावरून सुटतात.

ट्रॅमची माहितीः—( १ ) सासूनडॉकपासून ० नंबरची ट्रॅम निघून ती ग्रॅन्टस् बिल्डिंग, कुलाबा ट्रॅम आफिस यावरून म्युझियमपर्यंत जाते.

( २ ) म्युझियम वेस्ट पासून १ नंबरची ट्रॅम निघून सेक्रेटरीएट, हॉर्नबीरोड, म्युनिसिपल ऑफिस, धोबीतलाव यांवरून येऊन काळबादेवी, पायधुणी, भेंडीबाजार, भायखळा, लालवाडी व परळ यांवरून दादर पर्यंत जाते.


( ३ ) जनरलपोस्ट ऑफिस पासून ५ नंबरची ट्रॅम निघून हॉर्नबी रोड, पलटण रोड, महमद अलीरोड ( सिडनहॅमरोड ) जकेरिया मशिद, भेंडीबझार, जे. जे. हॉस्पिटल, भायखळयाचा पूल, राणीचा बाग, लालबाग यांवरून परळ पर्यंत जाते.

( ४ ) म्युझियम ईस्ट पासून १३ नंबरची ट्रॅम निघून टाऊन हॉल, मिंट रोड, जनरल पोष्ट ऑफिस, बोरीबंदर, क्राफर्ड मार्केट अबदुल रहिमान स्ट्रीट, बापू खोटे स्ट्रीट, नळबाजार, गोलपिठा, फाकलंड रोड, ग्रॅंटरोड कॉर्नर व फोरास रोड जंक्शन यांवरून ताडदेव पर्यंत जाते.

( ५ ) म्युझियम ईस्ट पासून १६ नंबरची ट्रॅम निघून मिंटरोड, जनरल पोस्ट ऑफिस, बोरीबंदर, क्राफर्ड मार्केट, अब्दुल रहिमानस्ट्रीट, पायधुणी, नळबाजार, गोलपिठा, ग्रॅंटरोड कॉर्नर, चर्नीरोड जंक्शन व ग्रॅंटरोडचा पूल यावरून गवाळिया तलावापर्यंत जाते.

( ६ ) म्युझियम वेस्ट पासून ६ नंबरची ट्रॅम निघून सेक्रेटरीएट, बोरीबंदर, म्युनिसिपल ऑफिस, धोबीतलाव, पालवा रोड, ठाकुरद्वार, गिरगांव पोर्तुगीज चर्चवरून, प्रार्थना समाज, चर्नीरोड

फोरास रोड, व क्लेअर रोड, यानें दादरकडे जाणाऱ्या फाट्याला भायखळ्याच्या पुलाजवळ उभ्या पारशापाशीं मिळते, व ती पुढें दादर पर्यंत जाते.



ट्रॅमचें चित्र.

(७) गवालियातलावापासून १० नंबरची ट्रॅम निघून ती ग्रँटरोड पुलावरून चर्निरोड जंक्शन, ग्रँटरोड कॉर्नर, दोनटांकी व जे. जे. हॉस्पिटल यांवरून माजगांव पर्यंत जाते.

(८) बेलार्डपिअर पासून १९ नंबरची ट्रॅम निघून ती फ्रियर रोड, क्र्यॉरनॉक बंदर, वाडी बंदर, डोंगरी बाजार, भेंडी बाजार, राऊंड टेंपल, गोलपिठा, प्रार्थना समाज यांवरून सॅन्डहर्स्ट ब्रीज पर्यंत जाते.

(९) सॅन्डहर्स्ट ब्रीज पासून २१ नंबरची ट्रॅम निघून ती प्रार्थना समाज, गोलपिठा, राऊंड टेंपल, भेंडी बाजार, डोंगरी बाजार, वाडी बंदर व रे रोड यांवरून टांक बंदर पर्यंत जाते.

(१०) धोबीतलावापासून २० नंबरची ट्रॅम निघून ती क्र्यॉरनॉक रोड, क्रॉफर्डमार्केट, क्र्यॉरनॉक बंदर, प्रिन्सेस डॉक यांवरून वाडी बंदरापर्यंत जाते.


(११) फ्लोरा फाउंटन् पासून ८ नंबरची ट्रॅम निघून ती एस्प्लनेड रोड, धोबीतलाव, पालवा रोड, गिरगांव पोर्तुगीज चर्च यांवरून आपेरा-हाऊस पर्यंत जाते.

(१२) सी. पी. टँक पासून १२ नंबरची ट्रॅम निघून ती नळबाजार, राऊंट टेंपल, दोन टांकीवरून रिपनरोडनें सात रस्त्यांपर्यंत जाते.

तिकिटांबद्दल साधारण माहिती:—सासुन डॉक पासून लाल-बागेच्या पलीकडे कोणत्याहि ट्रॅमनें गेल्यास १॥ आणा तिकीट पडतें. दादर अगर परळ पासून गिरगांव पोर्तुगीज चर्चच्या पुढें येणारास आणि दादर अगर परळ पासून पायधुणीच्या पुढें येणा-रास व दादर अगर परळ पासून जकेरिया मशिदीचे पुढें येणारास १॥ आणा तिकीट पडतें. ग्रँटरोड पुलापासून गवाळिया तलावापर्यंत जाणारास ·॥· आणा तिकीट पडतें, व गवाळिया तलावापासून व्हिक्टोरिया गार्डनचे पुढें जाणारास, गवाळिया तलावापासून बोरीबंदरचे पुढें जाणारास आणि गवाळिया तलावापासून कॉरनाक बंदरचे पुढें बेलार्डपिअरकडे जाणारास १॥ आणा तिकीट पडतें व इतर ठिकाणीं कोठेंही गेल्यास १ आणा तिकीट पडतें.

## बाम्बे इलेक्ट्रिक ट्रॅमवे कंपनीची ऑम्नीबस. ( मोटारबस )


१ अफगाणचर्च पासून ए ( *A* ) खूण असलेली मोटारबस निघून कुलाबा स्टेशन, वूडहाउसब्रीज, म्युझियम, फ्लोराफाउंटन आणि बोरीबंदर यांवरून क्राफर्डमार्केट पर्यंत जाते.




हें पहा, मोटारबसचें चित्र

२ बेलार्डपियर पासून बी ( B ) खूण असलेली मोटारबस निघून टाउनहॉल, फ्लोराफाउंटन, चर्चगेट स्टेशन, क्वीन्सरोड, सँढ्हर्स्टब्रीज, ह्यूजरोड, गांवदेवी, गवालिया तलाव यांवरून वॉर्डनरोड पर्यंत जाते.

३ सासून डॉक ( जुनें कुलाबा रेल्वे स्टेशन ) पासून सी ( C ) खूण असलेली मोटारबस निघून वुडहाऊसब्रीज, मेयोरोड, सेक्रेटरीएटच्या मागच्या रस्त्यानें चर्चगेट रेल्वे स्टेशनपर्यंत जाते.


वांद्रे
जी
(माहीम)
एफ
(परळ)
• परळ लॅबोरेटरी
(भायखळा)
डी
बी
(मांडवी)
सी
ए
मिन्सेस डॉक
व्हिक्टोरिया डॉक
अलेक्झान्ड्रा डॉक
बोरीबंदर
बॅलॉर्ड पीयर
हिंदुस्थानचा दरवाजा
उत्तर
पश्चिम
पूर्व
दक्षिण
१ मैल
दीपगृह
मुंबई बेट
स्थळे

४ म्युझियम पासून डी ( D ) खूण असलेली मोटारबस निघून शेअर बझार, इंपिरिअल बँक, टाऊनहॉल, फोर्ट मार्केट, न्यू कस्टम ऑफिस, जनरल पोस्ट ऑफिस, बोरीबंदर, क्राफर्ड मार्केटवरून प्रिन्सेसस्ट्रीटनें पालवारोड, ठाकुरद्वार, गिरगांव, ऑपेरा हाऊस, लॅमिंग्टन्‌रोड, जेकब् सर्कल, आर्थररोड यांवरून लालबाग पर्यंत जाते.

५ पायधुणी पासून ई ( E ) खूण असलेली मोटारबस निघून भेंडीबझार, राऊंड टेंपल, गोलपिठा, प्रार्थना समाज, सँडहर्स्ट-रोड, सँडहर्स्टब्रीज, चौपाटी बँडस्टँड वरून वाळकेश्वररोडनें गव्हर्नमेंट हाऊस वरून मलबारहिल पर्यंत जाते.

६ क्राफर्ड मार्केट पासून एच् ( H ) खूण असलेली मोटारबस निघून प्रिन्सेसस्ट्रीट, पालवारोड, ठाकुरद्वाररोडनें कुंभारतुकडीच्या नाक्यावरून, कावसजी पटेल तलाव, गिरगांव बॅकरोड, प्रार्थना समाज, सँडहर्स्ट रोड, सँडहर्स्ट ब्रीज, चौपाटी बँडस्टँड-वरून वाळकेश्वररोडनें गव्हर्नमेंट हाऊस वरून मलबार हिल-पर्यंत जाते.

तिकिटांबद्दल माहितीः—मोटारबसला ट्रॅमगाडीप्रमाणें बदलीचें तिकिट मिळत नाहीं. मोटारबसचीं तिकिटें अंतराचे मानानें १ ते ४ आण्यांपर्यंत आहेत.

विजेचे पाळणे [ लिफ्टस ] मुंबईत उंच उंच इमारती असल्यामुळें जिने चढून वर जाणें फार त्रासाचें होतें व कामानिमित्त वारंवार खालीं वर यावें जावें लागतें या करितां विजेच्या पाळण्याची सोय केलेली असते.

# पाठ ७ वा

## पाहण्यासारखीं स्थळें


खेडेगांवांतील पुष्कळ लोकांना एकदां तरी मुंबई पहावी असें वाटत असतें. याचें कारण काय ? मुंबईत पहाण्यासारखें काय आहे असें त्यांस विचारलें तर ते सांगतात, " आम्हांला माहीत नाहीं, पण पहाण्यासारखें पुष्कळ आहे. " त्यांचें म्हणणें कांहीं चुकीचें नाहीं. मुख्य गोष्ट ही कीं, इतके मोठे रस्ते, इतक्या मोठमोठ्या इमारती, इतकी रस्त्यांमध्यें लोकांची गर्दी खेडेगांवीं अगर आसपासच्या गांवीं पहावयास सांपडणार नाहीं. यात्रेंत ज्याप्रमाणें दुतर्फा दुकानें असतात त्याप्रमाणें मुंबईतील दुकानें पाहून कोणासही गंमतच वाटेल. शिवाय मुंबईत अशीं कांहीं ठिकाणें आहेत कीं तीं पाहिल्यावर खरोखरच कोणालाही आश्चर्य व आनंद वाटेल. आतां अशीं ठिकाणें कोणतीं व तेथें काय काय पाहण्यासारखें आहे तें पाहूं.

[ १ ] वेधशाळाः—कुलाब्याचे टोंकास आहे. येथें ताऱ्यांच्या गति, घड्याळांची बरोबर वेळ, पर्जन्यमान्, भूकंप, वादळ केव्हां होणार वगैरेबद्दल माहिती समजते.

[ २ ] ताजमहाल हॉटेलः—ही मोठी इमारत असून तेथें संस्थानिक युरोपियन वगैरे बडे लोक यांची जेवणाची व राहाण्याची सोय होते.

[ ३ ] टांकसाळः—हा नाणीं पाडण्याचा कारखाना आहे. येथें धातूंचा रस करून नाणीं पाडतात. टांकसाळ पहावयास जाणाऱ्याला अगोदर तेथील अधिकाऱ्यांची परवानगी मिळवावी लागते.

[ ४ ] म्युझियमः—इमारत फार मोठी असून तीमध्यें मेलेले पशुपक्षी, तसेंच जुनीं हत्यारें, दगडी व धातूंच्या मूर्ति, जुनीं नाणीं, शिलालेख, शिल्पकाम व ऐतिहासिक गोष्टींचे नमुने आहेत.



म्युझियम

ग्रंथ संग्रहालय
स्थळ
१३७
ध्रु. प्रवरा
30-12-83

[ ५ ] बोरीबंदर स्टेशनः—हे भव्य स्टेशन आहे. येथून जी.आय्. पी. रेल्वे निघते. येथें लोकांची ये जा फार असते. येथील गाड्यांची गर्दी, माणसांची गर्दी, आगगाड्या उभ्या राहण्याचीं ठिकाणें पाहून नवीन मनुष्य अगदीं गांगरून जातो. येथें १३ प्लॅटफॉर्म आहेत.

[ ६ ] राजाबाई टॉवरः—ही मुंबईमध्यें सर्वांत उंच इमारत आहे. वर गेलें असतां मुंबईचा देखावा एकदम पहावयास मिळतो.



राजाबाई टॉवर

[ ७ ] प्रिन्सेसडॉकः—ही सर्व गोद्यांत मोठी असून बोटी आंत येण्यासाठीं वाटेल तेव्हां काढतां व घालतां येणारा लांकडी पूल आहे. या गोदींत यान्त्रा पाहाण्यासारख्या आहेत. येथें

ड्रायडॉक [ सुकी गोदी ] आहे. तींत बोटींस रंग देणें व दुरुस्त करणें हीं कामें होतात.

[ ८ ] जे. जे. हॉस्पिटलः—याला बाटलीवाल्याचें इस्पितळ असेंही नांव आहे. या ठिकाणीं ४००।५०० रोग्यांची सोय मोफत केली जाते. तसेंच येथें मनुष्याच्या शरिराच्या आंतील सर्व भाग पहावयास सांपडतात.

[ ९ ] राणीचा बागः—येथें निरनिराळ्या जातींचीं झाडें व जिवंत पशु-पक्षी ठेविलेले आहेत. शिवाय मोठा वस्तुसंग्रह आहे. त्यामध्यें 'म्युझियम' प्रमाणें सर्व नमुने पहावयास मिळतात. त्यास 'आल्बर्ट-म्युझियम' म्हणतात.

[ १० ] परळलॅबोरेटरीः—येथें प्लेगप्रतिबंधक लस तयार करितात. शिवाय, सर्पदंशावर व पिसाळलेला कुत्रा चावला तर त्यावर खात्रीलायक उपाय मोफत करितात.

## पाठ ८ वा


### नकाशा

मुलांनो, आज आपणांला आपले वर्गाच्या खोलीचा नकाशा काढावयाचा आहे. तुम्हीं एकाद्या शहराचें चित्र पाहिलें आहे काय ? त्यामध्यें झाडें, घरें, गुरें, माणसें, व रस्ते यांचीं चित्रें काढलेलीं असतात. आपल्या ह्या वर्गाच्या नकाशांत अशीं निरनिराळीं चित्रें काढावयाचीं नाहींत तर वर्गांत ज्या वस्तु आहेत, त्यांजबद्दल कांहीं तरी खुणा करावयाच्या आहेत.

आपल्या वर्गाची लांबी किती आहे ती मोजा पाहूं. लांबी कशानें मोजाल ? फूट पट्टीनें. आणखी कशानें मोजतां येईल ? हातानें,

वर्गाची लांबी २४ फूट भरली त्याप्रमाणें रुंदी १८ फूट भरली, आतां एका कागदावर २४ फूट रेषा काढा. या लहानशा कागदावर एवढी मोठी रेषा काढतां येणार नाहीं. याकरितां आपण असें ठरवूं कीं, ६ फूट लांबीबद्दल १ इंच रेषा काढावयाची. याप्रमाणें २४ फूट लांबीबद्दल ४ इंच व १८ फुटांबद्दल ३ इंच रेषा काढावयाची यालाच प्रमाण म्हणतात. इंग्रजींत प्रमाणाला ' स्केल ' म्हणतात. आतां आपण प्रथम नकाशाच्या दिशा ठरवूं. कागद नीट धरा. वरचे बाजूस उत्तर नांव द्या. खालचे बाजूस दक्षिण नांव द्या, तसेंच उजवे हाताकडील बाजूस पूर्व आणि डावे हाताकडील बाजूस पश्चिम अशीं नांवें लिहा.

आतां आपले वर्गाचा दरवाजा कोणत्या दिशेस आहे? दक्षिणेस. नकाशा अशा तऱ्हेनें काढावयाचा असतो कीं, त्याची वरची बाजू उत्तर असावयाचीच. प्रथम आपण उत्तरेस जी भिंत आहे. तिच्याबद्दल रेषा काढूं. २४ फुटांबद्दल किती लांबीची रेषा काढावयाची ? ४ इंच. मग आपल्या कागदावर वरच्या बाजूस ४ इंच रेषा आडवी काढा. या रेषेच्या दोन्ही टोंकांपासून दक्षिणेकडे प्रत्येकीं ३ इंच रेषा उभी काढा. मग दक्षिण बाजूची रेषा काढा. आतां दरवाजा मधोमध आहे कीं जरा बाजूला आहे ? जरा पश्चिमेकडे आहे. म्हणून दक्षिण बाजूच्या रेषेवर ▭ असा चौकोन काढा. हा दरवाजा होय. आतां खिडक्या कोठें कोठें आहेत तें पाहूं. उत्तरेस २ खिडक्या आहेत त्या |॥| अशी खूण करून दाखवा. दक्षिणेला खिडकी आहे ती सुद्धां त्याच खुणेनें दाखवा. आतां मास्तरांची बसावयाची खुर्ची उत्तरेस ज्या दोन खिडक्या आहेत त्यांचे मध्यें आहे तेथें × अशी खूण करा. त्या खुर्ची समोर टेबल आहे तें |⊟| अशा खुणेनें दाखवा




वर्गाच्या खोलीचा नकाशा

पुढें मुलें बसण्याची बाकें आहेत तीं ⊓ अशा खुणेनें दाखवा. फळा कोणत्या दिशेला आहे? ईशान्येस. तेथें |×| अशी खूण करा.

हा आपल्या वर्गाचा नकाशा झाला अशा रीतीनें आपले शाळेचा नकाशा कसा काढावयाचा तें पुढले वेळीं पाहूं.

# पाठ ९ वा

## मुंबईची व्यवस्था

मुंबईत लोकवस्ती फार आहे. श्रीमंत लोकही पुष्कळ आहेत. कारखाने फारच आहेत. बंगले व चाळी अतिशय आहेत. एकंदरींत मुंबईत सर्वच गोष्टी मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा या अफाट शहराच्या बंदोबस्ताचें व व्यवस्थेचें काम कसें होत असेल! हें काम कसें होतें तें आपण पाहूं.

मुंबईचे रस्ते माणसांनीं फुलून गेलेले असतात; त्यांतच मोटारी, ट्रॅम, व्हिक्टोरिया ( घोड्यांच्या गाड्या ) सायकली, खटारे व हातगाड्या चालू असतात. अपघात न होईल अशा तऱ्हेनें हीं सर्व वाहनें चालविण्याच्या बाबतींत त्यांच्यावर लक्ष ठेवण्याकरितां नाक्या नाक्यावर पोलीस उभा असतो. त्याच्या हुकूमाप्रमाणें गाड्या चालविणारांस वागावें लागतें. अशा मोठ्या शहरांत गाड्या हांकण्याचे नियम ठरविलेले आहेत. त्यापैकीं एक नियम म्हणजे "गाड्या हांकणारांनीं गाड्या डावे बाजूनें हाकाव्या." गाडी वळविणें असेल तर हातानें खूण करून दाखविली पाहिजे. अशा रीतीनें रस्त्यांतील रहदारी सुरळीत चालते.

पोलिसांचें दुसरें काम म्हणजे कोठें मारामारी अगर दरवडा पडला तर गुन्हेगारांस पकडून कोर्टांत उभें करणें. पोलिसांवर

जो अधिकारी असतो, त्यास पोलिस इन्स्पेक्टर म्हणतात व सर्व पोलिस इन्स्पेक्टरांवर मुख्य अधिकारी असतो त्यास पोलिस-कमिशनर म्हणतात. मारामारी, चोरी यांच्या फिर्यादी पोलिसकोर्टांत चालतात. एस्प्लनेड, गिरगांव, माजगांव, व दादर येथें पोलिस कोर्टें आहेत. आणखी तक्रारी अगर भांडणें कशावरून होतात? देण्याघेण्यावरून अगर जमिनीच्या हद्दीवरून, अशा प्रकारच्या फिर्यादी 'स्मॉल–कॉज' कोर्टांत चालतात या सर्वांवरील मुख्य कोर्टास 'हाय कोर्ट' म्हणतात.

शिक्षण:—शहरांतील सर्व जातीच्या लोकांच्या मुलांमुलींना प्राथमिक शिक्षण देण्याची व्यवस्था 'म्युनिसिपालिटी' करते. या करितां मराठी, गुजराथी, उर्दू, तेलगू व तामीळ मुलांमुलींच्या शाळा आहेत. म्युनिसिपालिटींत लोकांनीं निवडलेले व सरकारनें निवडलेले १०८ लोक असतात. त्यापैकींच १२ व कार्पोरेटरनीं निवडलेले ४ मिळून १६ सभासदांकडे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था सोंपविलेली आहे. तिला 'स्कूल्स कमिटी' म्हणतात. सर्व शाळांची व्यवस्था राखण्याकरितां 'सेक्रेटरी' या नांवाचे एक अधिकारी नेमिलेले आहेत. शाळेंतील मुलांमुलींची परीक्षा घेण्याकरितां व वरचेवर पहाणी करण्याकरितां 'सुपरिंटेंडेंट' 'लेडी सुपरिंटेंडेंट' व 'सुपरवायझर' या नांवाचे अधिकारी आहेत. मुंबईच्या 'एफ' व 'जी' वार्डांत मोफत व सक्तीचें शिक्षण सुरू केलें आहे. म्युनिसिपल शाळांतून ( मराठी, गुजराथी, उर्दू व तामीळ ) ६१ हजारांवर मुलें व मुली शिक्षण घेत आहेत. मराठी मुलांमुलींच्या शाळा १४८ आहेत. गुजराथी मुलांमुलींच्या ७२, उर्दू मुलांमुलींच्या ८४ व तामीळ ५ मिळून ३०९ शाळा आहेत. इंग्रजी शिक्षण देणारीं 'हायस्कूलें' मुंबईंत पुष्कळ आहेत त्यांत 'एल्फिन्स्टन हायस्कूल' सरकारी

आहे. तसेंच उच्च दर्जाचें शिक्षण देणारीं ' कॉलेजें ' ही आहेत. शिवाय मेडिकल कॉलेज, व्हेटरनरी कॉलेज, टेक्निकलस्कूल येथेंही त्या त्या प्रकारचें शिक्षण दिलें जातें.

आरोग्यः—शहरांत लोकांचें आरोग्य नीट रहावें म्हणून म्युनिसिपालिटी फार खटपट करिते. म्युनिसिपालिटीनें गोरगरिबांस आजारीपणांत मोफत औषध मिळावें म्हणून दवाखाने घातले आहेत व कांहीं श्रीमंत लोकांनीं ' हास्पिटलें ' बांधिलीं आहेत. जे. जे. हास्पिटल ( बाटलीवाला ), वाडिया हास्पिटल, किंग् एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल, गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटल हीं मुख्य होत. या हॉस्पिटलांचा व म्युनिसिपल दवाखान्यांचा लोकांना फार उपयोग होतो.

देवी काढणें:—देवी काढण्याचें मुख्य ठिकाण ' परळ पोइबावडी ' येथें असून तेथें रोज ( रविवार खेरीज ) ११ ते ५ पर्यंत मोफत देवी काढल्या जातात. शिवाय निरनिराळ्या वारीं निरनिराळ्या ठिकाणीं मोफत देवी टोंचण्याची व्यवस्था म्युनिसिपालिटीनें केली आहे.

प्लेगच्या दिवसांत प्लेग प्रतिबंधक औषधें टोंचण्याचें काम केलें जातें, सांथीचे रोगी भायखळ्या जवळील ' मराठा हॉस्पिटल ' मध्यें ठेवून औषधोपचार करितात.

पूर्वीं मुंबईत मलेरिया नेहमीं असे; परंतु रस्ते, गटारें घरें हीं सुधारून व शहरांतील लहान मोठीं डबकीं बुजवून डांसांची उत्पत्तिस्थानें नाहींशीं केल्यामुळें मलेरिया बहुतेक नाहींसा झाला आहे.

रस्ते सुधारणें, घाण पाण्याचा निकाल करणें, स्वच्छ पाण्याचा भरपूर पुरवठा करणें, या बाबतींत म्युनिसिपालिटी फार लक्ष देते व त्यामुळें शहराचें आरोग्य दिवसेंदिवस सुधारत आहे.

शिवाय रात्रीच्या वेळीं रस्त्यावर उजेडाची सोय करणें, जन्म मृत्यूची नोंद ठेवणें, जुनीं घरें पाडून नवीन बांधणें इत्यादि कामें म्युनिसिपालिटीस करावीं लागतात.

## पाठ १० वा

### सफर १ ली

#### ठाकुरद्वार ते क्राफर्ड मार्केट

मुलांनो, आज आपण फिरावयास जाऊं. आणि शाळेच्या आजूबाजूच्या भागाची माहिती करून घेऊं.आपल्या शाळेचें तोंड कोणत्या दिशेला आहे ? शाळेच्या बाहेरचा रस्ता कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेला जातो ? चला, ठाकुरद्वारचे नाक्यावर आपण जाऊं, येथें पहा, हे दोन रस्ते एक पश्चिमेस व एक पूर्वेस जात आहे, पण आपणास आज ट्रॅमचे रस्त्यानें जावयाचें आहे. रस्त्यानें चालतांना शक्य तों फुटपाथवरून चालावें. रस्त्यांत व्हिक्टोरिया, मोटारी, सायकली, ट्रॅम यांची फार गर्दी असते म्हणून म्युनिसिपालिटीनें रस्त्याच्या बाजूला ‘ फुटपाथ ’ बांधिले आहेत त्यांवरून गाड्या घोडीं येणार नाहींत. हें पहा एक राममंदीर. यांतील मूर्ती काळया पाषाणाच्या असल्यामुळें याला ‘ काळा राम ’ म्हणतात, हें राममंदीर फार जुनें आहे. रस्त्याचे दुसरे बाजूला ही पहा प्रोफेसर दाते यांची मुक्यांची शाळा. येथें मुक्या मुलांना बोलावयास व वाचावयास फुकट शिकवितात. पुढें ही पहा झावबाची वाडी. येथें लहान मुलां-मुलींकरितां म्युनिसिपालिटीनें शाळा काढली आहे. या वाडीचे बाहेर रस्त्यावर एक देवालय आहे. त्याला ‘ गोराराम, म्हणतात. तेथील ‘ राम ’ ‘ लक्ष्मण ’ व ‘ सीता ’ यांच्या मूर्ति शुभ्र संगम-रवरी दगडाच्या आहेत. या देवालयाचे समोर भाई जीवनजीची

गल्ली आहे. या गल्लींत 'प्रभुसेमिनरी' मुलांमुलींची एक शाळा आहे, व मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय आहे. या गल्लीच्या पुढें गेल्यावर नवरोजी स्ट्रीट लागतो त्यांत एक मुलींचें हायस्कूल आहे, त्याचे पुढें आणखी एक राममंदीर लागतें नंतर पुढें गेल्यावर ठाकुरद्वार पोस्ट ऑफिस लागतें. व त्याचे पुढें ठाकुरद्वार मुलांमुलींची शाळा लागते आतां ही गल्ली पाहा. त्या गल्लींत जाऊं. या गल्लींत एक देऊळ आहे. पण तें आपलें हिंदूचें देऊळ नाहीं खिश्चन लोकांचें आहे. खिश्चन लोकांच्या देवळास 'चर्च' म्हणतात. तेथें खिश्चन लोक देवाची प्रार्थना करितात. विशेषतः रविवारीं या देवळांत फार गर्दी असते. या देवळाला 'दाभूळ चर्च' असें म्हणतात.

या गल्लींतून परत ट्रॅमच्या रस्त्यावर जाऊं. जरा पुढें गेल्यावर एक मोठा बंगला दिसतो. तो 'नानाशंकरशेट' यांचा बंगला होय. नानाशंकरशेट हे मुंबईत फार मोठे श्रीमंत व थोर पुरुष होऊन गेले. त्यांनीं मॅट्रिकच्या परीक्षेंत जास्त मार्क मिळविणारास स्कालरशिप देण्याकरितां पैसे दिले आहेत. शिवाय हिंदू लोकांचें सोनापूरही (प्रेतें जाळण्याची जागा) बांधून ठेविलें आहे. त्यांच्या बंगल्यासमोरच बॅरिस्टर 'मुकुंदराव जयकर' यांचा बंगला आहे. ते देशांतील एक मोठे पुढारी आहेत. आतां आपण रस्ता ओलांडून जाऊं. रस्ता ओलांडतांना गाडी सायकल पाहून जा. गाड्या हांकणारे गाड्या नेहमीं आपल्या डावे हाताकडून हांकतात म्हणून प्रथम आपण उजवे बाजूकडे लक्ष ठेवावें व नंतर अर्धा रस्ता ओलांडून आल्यावर डावे बाजूकडे लक्ष द्यावें. ही जी गल्ली दिसते त्या गल्लीला 'दादीशेट अग्यारी' लेन म्हणतात. येथें एक 'नवी वाडी' म्हणून भाग आहे त्या ठिकाणीं दरवर्षीं मोठी जत्रा भरते. तुम्हांपैकीं पुष्कळांनीं ती जत्रा पाहिलीही असेल. या गल्लींत नवीवाडी म्यु० मुलांमुलींची शाळा आहे. आणखी त्या गल्लींत पुढें गेल्यावर

काय आहे तें पुढें एकादे वेळीं पाहूं. पुढें ट्रॅमचे रस्त्यानें चला. या ठिकाणीं मोठमोठीं दुकानें आहेत. किराणामाल व धान्य याचीं दुकानें दिसतात. हें पाहा येथें एक भाजीपाल्याचें मार्केटही आहे. याला चिराबाजार मार्केट म्हणतात. या रस्त्यांतून जातांना ही पाहा सोनापूर गल्ली लागते. सोनापूर म्हणजे काय हें मागें तुम्हांला सांगितलें आहेच. त्या ठिकाणची जास्त माहिती पुढें सांगूं. आतांपर्यंत येतांना आपणांस लहान लहान गल्ल्या दिसल्या. पण हा पहा केवढा मोठा रस्ता आहे तो ! हा कोणत्या दिशेकडून कोणत्या दिशेकडे गेला आहे ? याला 'प्रिन्सेस स्ट्रीट' म्हणतात. या ठिकाणीं इतर नाक्याप्रमाणें शिपाई मध्यें उभा राहून गाड्या मोटारी सोडीत नाहीं. येथें दिव्यांच्या खुणांनीं मोटारी, गाड्या सुरळीत चालतात. ते हे वर दिवे आहेत. ज्या रस्त्यानें गाड्या चालू ठेवावयाच्या असतील त्या रस्त्यावरील समोरासमोरचे दिवे हिरवे करतात व मोटारी सोडावयाच्या नसतील त्या रस्त्यावरील तांबडे करितात. हे सर्व दिवे विजेचे आहेत. व प्रत्येक ठिकाणीं हिरवी व लाल अशा कांचा लाविलेले दोन दोन दिवे आहेत. अशा प्रकारच्या नाक्यावरून जातांना फार सावधगिरीनें गेलें पाहिजे. आपणांसही या दिव्यांचा उपयोग होतो.

या नाक्यावरून समोर गेलें म्हणजे कितीतरी रस्ते एकत्र मिळालेले दिसतात. या नाक्याला धोबीतलाव नाका म्हणतात. हा एथें सिनेमा दिसत आहे. त्या ठिकाणीं पूर्वीं धोबीतलाव होता पण म्युनिसिपालिटीनें तो बुजवून टाकिला. असे पुष्कळसे तलाव म्यु० नें आरोग्याकरितां बुजवून टाकिले आहेत. आतांपर्यंत आपण ज्या रस्त्यानें आलों त्याला 'गिरगांव रोड' अगर 'पालवा रोड' म्हणतात. या नाक्यावरून समोर न जातां डावे बाजूकडे वळा. पुढें हा रस्ता काळबादेवी रोड होय. या रस्त्यानें आज आपणांस जावयाचें नाहीं. आपण आज पुढें जाऊं. ही पहा इमारत हिला 'स्मालकॉज कोर्ट' म्हणतात. येथें

देण्या घेण्यावरून ज्या फिर्यादी होतात त्या येथें चालतात. या रस्त्यालाही मोठमोठीं दुकानें आहेत. उजवे बाजूला 'सेंट झेवियर हायस्कूल' लार्ड हारीस म्यु. म. स्कूल, गोकुळदास तेजपाळ हॉस्पिटल व पोलिस कमिशनरचें ऑफिस हीं आहेत. हें पहा समोर केवढें घड्याळ आहे तें ! चारी बाजूला चार घड्याळें आहेत. हेंच 'क्रॉफर्ड मार्केट' होय. चला आपण आंत जाऊं हीं पहा, फळांचीं दुकानें. येथें संत्रीं, मोसंबीं, वगैरे सर्व प्रकारचीं उत्तम फळें मिळतात. तसेंच येथें कांदे, बटाटे, मीठ, मिरची, गूळ वगैरे जिन्नस आणि पोपट, कुत्रे वगैरे प्राणीही मिळतात.

हीं पाहा फुलांचीं दुकानें, येथें समारंभाकरितां फुलें, हार व तुरे वगैरे मिळतात हें मुंबईतील सर्वांत मोठें मार्केट आहे. आतां आज आपण फिरलों–तेवढें पुरे. ही आज मिळविलेली माहिती तुम्ही नीट लक्षांत ठेवा.

## पाठ ११ वा

### सफर २ री

ठाकुरद्वार रोड पासून पूर्व बाजूनें क्राफर्ड मार्केट पर्यंत

मुलांनो, मागील सफर आपण क्राफर्ड मार्केटपर्यंत केली होती. आज आतां दुसऱ्या रस्त्यानें फिरावयास जाऊं, प्रथम सर्वांनीं शाळेसमोरील रस्त्यावर जाऊं. व मागचे प्रमाणें ठाकुर-द्वार नाक्यावर जाऊं आणि उजवे बाजूला वळूं, पहा या रस्त्यावर पुष्कळ लोक भाजीपाला विकावयास बसलेले आपणांस दिसतात. पुढें गेल्यावर डावे बाजूला जी गल्ली लागते तिला 'मुगभाट क्रॉस लेन' म्हणतात. तसेंच पुढें गेल्यावर 'दत्तमंदीर' लागतें. त्याचे पुढें साऊथ गिरगांव म्युनिसिपल मुलांमुलींची शाळा आहे. याच्यापुढें फणसवाडी म्हणून एक गल्ली आहे. पुढें तीन रस्ते

एके ठिकाणीं मिळतात त्यास ‘ कुंभारतुकडी नाका ’ असें म्हणतात. त्या नाक्यावरून समोर गेलें असतां डावीकडे एक दरवाजा लागतो त्यांतून आपण आंत जाऊं. हा पहा पांजरपोळ–पांजरपोळ म्हणजे लोकांनीं सोडून दिलेलीं गुरें, पक्षी वगैरे पाळण्याचें ठिकाण. तसेंच पुढें गेलें असतां ‘ लक्ष्मीनारायणाचें ’ देऊळ आहे. देवालयांतील मूर्ती पहाण्यासारख्या आहेत. देवालयाचा कळस सोन्याचा असून समोर मोठी धर्मशाळा आहे, आतां परत कुंभारतुकडीच्या नाक्यावर येऊं व समोर जाऊं.

हा रस्ता भुलेश्वरच्या देवळाकडे जातो. किती गर्दी आहे या रस्त्याला ? लोकांची रहदारी फार व रस्ता जरा अरुंद त्यामुळें फारच गर्दी वाटते. येथेंही ठाकुरद्वार रस्त्याप्रमाणें रस्त्यावर भाजीपाला विकावयास लोक बसतात हें भुलेश्वरचें देवालय पाहा. हें फार जुन्या काळचें देऊळ आहे. देवालयाच्या आंतील भाग फार खोल असून तेथें अंधार आहे. समोर पूर्वीं तलाव होता परंतु आरोग्याकरितां म्युनिसिपालिटीनें तो बुजवून टाकिला आहे. देवालयाच्या समोर जी दगडी इमारत दिसते तें भुलेश्वर मार्केट होय. येथें सर्व तऱ्हेचा भाजीपाला व फळफळावळ उत्तम मिळते. वरच्या मजल्यावर म्यु० गुजराथी शाळा आहे. या भागांत गुजराथी व्यापारी लोकांची वस्ती फार आहे. मार्केटच्या बाजूला बंबखाना आहे. कोठेंही आग लागली असतां बंब जाऊन-आग विझावितां येते. यास इंग्रजींत ‘ फायरब्रिगेड ’ म्हणतात. बंबखान्याजवळून ट्रॅमचा रस्ता जातो तो काळबादेवी रोड होय. हा उजव्या बाजूनें धोबीतलाव पर्यंत जातो. हा रस्ता ओलांडून आपण पुढें जाऊं. या रस्त्यावर डावे बाजूला काश्मिरी शाली, गालिचे वगैरे विकण्याचीं दुकानें आहेत. या रस्त्यावर सोनें, चांदी, मोतीं, जवाहीर यांची दुकानें असल्यामुळें त्याला मोतीबाजार म्हणतात याच रस्त्यावर हें पहा मुंबादेवीचें देऊळ. देवी मोरावर बसलेली

असून पहाण्यासारखी आहे. देवळाजवळ एक मोठा तलाव आहे. त्याला मुंबादेवीचा तलाव म्हणतात. याच देवीच्या नांवावरून ह्या शहराला मुंबई हें नांव पडलें. बाहेर पडल्यावर पुढें मुळजीजेठा मार्केट लागतें. पहा किती मोठमोठीं दुकानें आहेत तीं ! व्यापारी लोक कापड खरेदी करून किरकोळीनें विकतात. अशींच कांहीं मार्किट आपणांस येथें आढळतील. ही पहा मशीद. ही जुम्मामशीद होय ही मुंबईतील सर्वांत मोठी मशीद होय. मशीद म्हणजे मुसलमान लोकांचें प्रार्थना मंदीर. या मशिदीच्या समोर जीं मोठमोठीं कापडाचीं दुकानें दिसतात तें " मंगळदास " मार्केट होय. या मार्केटवरून समोर गेलें असतां क्राफर्डमार्केट लागतें. क्राफर्ड मार्केट संबंधीं माहिती मागील वेळीं आपण मिळविली आहेच आतां आज पुरे.

# पाठ १२ वा

## सफर ३ री

ठाकुरद्वार रोड पासून पश्चिम बाजूनें क्राफर्ड मार्केट पर्यंत

मागील वेळेस आपण ठाकुरद्वार रोडनें क्राफर्ड मार्केटपर्यंत फिरावयास गेलों होतों. आज सर्वांनीं ठाकुरद्वार नाक्यावर चला. उजवे बाजूकडचा रस्ता भुलेश्वरकडे जातो हें तुम्हांस माहीत आहे. डावीकडे जो रस्ता जातो तोही ठाकूरद्वार रोडच होय. तो पुढें क्वीन्सरोडला मिळाला आहे. आपण त्या रस्त्यानें जाऊं. या ठिकाणीं पुष्कळशी वस्ती पारशी लोकांची आहे. ही पाहा. पारशी लोकांची धर्मशाळा. [ गोरगरीबांस अगर प्रवाशांस उतरण्याची जागा. ] हें पारशी लोकांचें देऊळ पाहा. पारशी लोकांच्या देवळास ' अग्यारी ' म्हणतात. अग्यारींत नेहमीं विस्तव राखतात. पारशी लोक अग्निपूजक आहेत ते अग्यारींत जाऊन धूप, चंदन

वगैरे सुवासिक पदार्थ अग्नींत टाकितात तेणेंकरून अग्यारी समोरून गेलें असतां बहुतेक सुवास येतो.

आतां आपण क्वीन्स रोडवर आलों. या रस्त्याला नेहमीं मोटारींची गर्दी असते. हा रस्ता ओलांडणें असेल तर फारच काळजी घ्यावी लागते, आपणाला रस्ता ओलांडून आज जावयाचें नाहीं. डावीकडे वळा. व तेथून पुढें चला. डावे हाताला पहा हीं थडगीं आहेत. परंतु उजवे बाजूला एका पुढें एक असे ख्रिश्चन, विल्सन्कॉलेज, हिंदू, इस्लामी व पारशी असे जिमखाने असून पुढें मरीन लाईन्स स्टेशन आहे. आतां त्याचे पुढें हिंदु लोकांचीं प्रेतें जाळण्याची जागा आहे. ( मुसलमान, ख्रिश्चन वगैरे जातींत प्रेतें पुरण्याची वहिवाट आहे. ) पारशी लोकांचीं प्रेतं एका विहीरींत नेऊन ठेवितात. हिंदु लोकांत मात्र प्रेतं जाळण्याची वहिवाट आहे. याला ‘ सोनापूर ’ म्हणतात. हें सोनापूर म्हणजे नाना शंकर शेट यांचें स्मारक होय. हा जो रस्ता लागतो तो प्रिन्सेस स्ट्रीट होय. हें उजवे बाजूला पहा मरीन लाइन्स स्टेशन आहे. आतां प्रिन्सेस स्ट्रीटनें जाऊं. हा पहा ट्रॅमचा रस्ता हा कोठून आलेला आहे ? सांगा पाहूं. हा रस्ता ठाकुरद्वार-कडून आलेला आहे. व तो धोबीतलावाकडे गेला आहे. येथें रस्ता ओलांडतें वेळीं दिव्याकडे लक्ष ठेवा. चला पुढें हा दुसरा ट्रॅम रस्ता, हा काळबादेवी रोड होय. हा भुलेश्वरच्या बाजूनें येऊन धोबीतलाव पर्यंत गेला आहे. हा रस्ता ओलांडून गेलों म्हणजे दोन रस्ते फुटतात एक क्राफर्ड मार्केटकडे जातो व दुसरा जुम्मामशिदीकडे जातो. आपण मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यानें जाऊं व मार्केटजवळ मोटार बसमध्यें बसून ठाकुरद्वारकडे येऊं.

# पाठ १३ वा

## सफर ४ थी

### ठाकुरद्वार पासून लालबाग पर्यंत

मुलांनो, आज आपणास बरेंच लांब फिरावयास जावयाचें आहे, म्हणून आपण मोटार बस मध्यें बसूं. मोटार बस ह्या ट्रॅम कंपनीनें सुरू केल्या आहेत. ठाकुरद्वारच्या नाक्यावर D अशी खूण असलेल्या मोटारींत आपण बसूं. ही पहा, आली मोटार बस हिला कोणती खूण आहे ? अरे, ही नव्हे आपली मोटार बस, हिला H अशी खूण आहे. ही मोटार ठाकुरद्वाररोड, गिरगांव बॅकरोड, सँडहर्स्टरोड, व चौपाटी यांवरून मलबार हिल-पर्यंत जाते. ही पहा, हिचे मागून D अशी खूण असलेली मोटार बस आली. बसा आंत.

ही पहा मुगभाट गल्ली या गल्लींत एक म्युनिसिपालिटीची शाळा आहे. त्याचे पुढें डावे हाताला गिरगांव मुलांमुलींची शाळा आहे. जरा पुढें उजवे हाताला कांदेवाडी आहे. आतां आपली मोटार गिरगांवचे नाक्यावर आली, येथेंही चार रस्ते आहेत, डावे बाजूचा रस्ता चर्नीरोड स्टेशनवर जातो, उजवे बाजूचा प्रार्थना समाजाकडे जातो. हें पहा, समोरचें गिरगांव 'पोर्तुगीज चर्च' आतां आपली मोटार बस 'रॉयल ऑपेरा हाऊस' जवळ जाईल. हें पहा, डावे बाजूकडे रॉयल ऑपेरा हाऊस. हें सिनेमाचें थिएटर असून पहाण्यासारखें आहे. आतां आपली मोटार वळून गेल्यावर जो रस्ता समोर दिसतो तो लॅमिंग्टन् रोड होय. आपण जरा पुढें गेल्यावर जो दक्षिण उत्तर रस्ता येईल तो गिरगांव बॅकरोड. पहा, या नाक्यावर उजवे बाजूला हें एक सिनेमाचें थिएटर आहे, त्यास 'इंपिरिअल सिनेमा' म्हणतात. त्याचे समोर लॅमिंग्टन् रोड मुलांमुलींची शाळा आहे.

त्याचे पुढें हें पहा, लॅमिंग्टन् रोड पोलिस स्टेशन आलें. हा पहा एक पूल आला, हा ग्रँटरोडचा पूल. ह्या पुलाचे जवळच खालचे बाजूला ग्रँटरोड स्टेशन आहे. या पुलावरून जी ट्रॅम येत आहे ती गवालिया तलावाकडून आली व ती म्युझियमपर्यंत जाईल. या ट्रॅमचा नंबर १६ असतो. या पुलापासून एक १० नंबरची ट्रॅम निघते. ती माझगांवपर्यंत जाते. आतां हा रस्ता ओलांडल्यावर डावे बाजूला ही पहा एक मोठी इमारत आली हिला " गिल्डर टँक बिल्डिंग " म्हणतात. येथें स्कूल्स कमेटीच्या सेक्रेटरी साहेबांचें ऑफिस आहे. वरचे मजल्यावर मराठी व गुजराथी मुलांमुलींच्या शाळा आहेत. या इमारतीचे पुढें हें जें मोठें मैदान दिसत आहे तेथें म्युनिसिपल शाळांतील मुलां-मुलींचे चढाओढीचे खेळ होतात. हें नाकें ओलांडून गेल्यावर आपणास एक पूल लागेल त्यावरून १३ नंबरची ट्रॅम ताडदेवकडे जाते. हें पहा एक मोठें स्टेशन आलें. त्याचें नांव कोण सांगतो ? याला ' बॉम्बे सेंट्रल ' म्हणतात. येथून बी. बी. रेल्वेच्या लांब जाणाऱ्या गाड्या सुटतात. स्टेशन पहाण्यासारखें आहे. एकादेवेळीं तुम्हांस घेऊन जाईन. हा रस्ता ओलांडल्यावर दोहों बाजूला मोठमोठे बंगले दिसतात. या रस्त्याला लोकांची फारशी गर्दी नाहीं हें पहा एक कारंजें दिसूं लागलें. आतां आपली मोटर ज्या ठिकाणीं उभी राहील त्याला ' जेकब सर्कल ' किंवा ' सात रस्ता ' म्हणतात. येथून ७ रस्ते निरनिराळ्या ठिकाणीं गेले आहेत. पहा आपले उजवे हातचे रस्त्यानें १२ नंबरची ट्रॅम माधवबागेकडे जात आहे. आपली बस आतां येथून पुढें जाईल त्या रस्त्याच्या उजवे हाताला एक आर्थर रोड हॉस्पिटल आहे. आतां पुढें ज्या दगडी मोठ्या भिंती दिसतात तो एक तुरुंग आहे. त्याला ' आर्थर रोड जेल ' म्हणतात. जेल म्हणजेच तुरुंग.

येथें चोरी, मारामारी, दरवडे वगैरे करणाऱ्या कैद्यांना ठेवितात. आतां आपली मोटार पुलावर चढूं लागली पहा. हा ' आर्थर-

ब्रिज ( पूल )' होय. या पुलाखालीं जी. आय. पी. रेल्वेचें 'चिंचपोकळी' स्टेशन आहे. पुलावरून उतरल्यावर आपली मोटार ट्रॅमच्या रस्त्यावर आली. लालबाग येथें एक मुलामुलींची शाळा आहे. हें ट्रॅमचें 'लालबाग' स्टेशन होय. D ही खूण असलेली मोटारबस लालबागपर्यंत येऊन आलेल्या रस्त्यानें परत जाते. आपण लालबागच्या नाक्यावरून जरा फिरून त्याच मोटारनें परत जाऊं.

---

# पाठ १४ वा

## सफर ५ वी

### धोबीतलावपासून राणीच्या बागेपर्यंत

मुलांनो, आपण धोबीतलावाच्या नाक्यावर जाऊं व तेथें ट्रॅममध्यें बसून फिरावयास जाऊं, धोबीतलावाच्या नाक्यापासून सहा रस्ते फुटतात. जरा येथें उभे रहा. निरनिराळ्या रस्त्यांनीं ट्रॅमगाड्या येत आहेत व जात आहेत. त्या पाहूं, ही पहा १ नंबरची ट्रॅम आली तीमध्यें चढा. ही काळबादेवी रस्त्यानें दादरपर्यंत जाते. हीं पहा पुस्तकांचीं दुकानें, येथें कोणतीहीं पुस्तकें मिळतात. हा आडवा रस्ता तुम्हांस माहितच आहे. हा प्रिन्सेस स्ट्रीट होय. पुढें या रस्त्यावर कितीतरी मोठमोठ्या इमारती आहेत. या इमारतींत तळमजल्यांत मोठमोठीं दुकानें आहेत. कांहीं ठिकाणीं मजल्यावरही दुकानें आहेत. कापडाचीं, टोप्यांचीं, सायकलचीं, बाजाच्या पेट्या व फोनोग्राफ वगैरेचीं दुकानें आपणांस दिसतात. येथें निरनिराळ्या भागांतून लोक जिन्नस खरेदी करण्याकरितां येतात. त्यामुळें या रस्त्याला नेहमीं फार गर्दी असते. हें पहा काळबादेवीचें देऊळ. याच देवीचे नांवावरून या रस्त्याला काळबादेवी रोड असें नांव पडलें आहे. येथें दर वर्षीं मार्गशीर्ष महिन्यांत अमावास्येस मोठी जत्रा भरते. ही तांबडी गाडी पहा.

हा आगीचा बंब आहे. डावे बाजूला भुलेश्वरमार्केट व उजवे बाजूला 'मोतीबाजार' आहे. आतां आपणांस तांब्यापितळेच्या भांड्यांचीं दुकानें दिसतात. हाच 'तांबाकांटा' होय. आतां आपली ट्रॅम पायधुणीच्या नाक्यावर आली. येथेंही धोबीतलावा-प्रमाणें निरनिराळया रस्त्यांनीं ट्रॅम येत आहेत व जात आहेत. या ठिकाणींही मोठमोठीं दुकानें आहेत. हें पहा पोलीस स्टेशन. याला पायधुणी पोलीस स्टेशन म्हणतात. या ठिकाणीं जैनांचें एक मोठें देऊळ आहे. थोडें पुढें गेल्यावर भेंडीबाजार येईल हा पहा भेंडीबाजार आला. येथें मुसलमान लोकांची वस्ती फार आहे. हा पहा महंमदअल्ली रोड या रस्त्यानें ५ नंबरची ट्रॅम बोरीबंदरपर्यंत जाते. हा आडवा रस्ता सँडहर्स्ट रोड होय. या रस्त्यानें १९ व २१ नंबरच्या ट्रॅम गाड्या जात आहेत व येत आहेत. येथेंही मोठा व्यापार चालतो. आतां आपण जे. जे. हॉस्पिटल जवळ आलों. तें पहा जे. जे. हॉस्पिटल. याबद्दल माहिती मागें आलेली आहेच. ही पहा, आडव्या रस्त्याला १० नंबरची ट्रॅम दिसते. ती ग्रँटरोडच्या पुलापासून निघून माजगांवपर्यंत जाते. आतां समोर जो पूल दिसत आहे त्यावरून आपण जाणार आहों. हा गिरगांवकडून येणारा ट्रॅमचा रस्ता येथें मिळाला आहे. हा पहा उभा पारशी. या पुलाखालून जी. आय. पी रेल्वे गेली आहे, पूल उतरल्याबरोबर हें पोलीस स्टेशन पहा. याचें नांव भायखळा पोलिस स्टेशन. डावेबाजूला तें दगडी देऊळ पहा. हें कोणाचें असावें बरें ? अगदीं वर पहा म्हणजे हें कोणाचें देऊळ आहे हें एकाद्याच्या लक्षांत येईल. या देवळावर † असा क्रॉस आहे त्यावरून हें ख्रिश्चन लोकांचें देऊळ आहे. यास भायखळा चर्च म्हणतात. जी. आय् पी. रेल्वेच्या गाड्या भायखळा पुलाखालून येऊन त्या येथें थांबतात, तें हें भायखळा स्टेशन. येथें सर्व गाड्या उभ्या राहातात, हें मोठें स्टेशन आहे येथें पुष्कळ माल उतरतो. हें जें उंच घड्याळ दिसत आहे तें राणीच्या बागेंतील होय. तेथें आप-

णास उतरावयाचें आहे. या पहा येथें पुष्कळ मोटारबस उभ्या आहेत. हा मोटारबसचा तबेला होय याच्या शेजारीं भायखळा मार्केट आहे. येथें भाजी पाला फार स्वस्त मिळतो. म्हणून भाजी पाला विकणारे लोक येथूनच भाजी खरेदी करून निरनिराळ्या भागांत नेऊन विकतात. हें पहा घडयाळ आलेंच, उतरा येथें. आतां आपण राणीच्या बागेंत जाऊं. याठिकाणीं जो बंगला दिसत आहे. त्यांत निरनिराळ्या वस्तू पहाण्यासाठीं ठेविल्या आहेत. त्यास 'आल्बर्ट म्युझियम' म्हणतात. तो आपण प्रथम पाहूं, नंतर निरनिराळे जिवंत पशुपक्षी, निरनिराळीं झाडें पाहून परत जाऊं.

# पाठ १५ वा

## सफर ६ वी

"लालबागपासून टिळकपुलावरून किंगजसर्कल"

मुलांनो, आपण मागें एकदां मोटारबसमधून लालबागपर्यंत गेलों होतों. आज तसेच लालबागला जाऊं व तेथें दादरकडे जाणाऱ्या ट्रॅममध्यें बसूं.

लालबागपासून दादरकडे जो रस्ता जातो त्या रस्त्यानें १ व ६ नंबरच्या ट्रॅमगाड्या जातात. ही पहा १ नंबरची ट्रॅम आली. ही कोणीकडून आली बरें? या गाडीनें आपण राणीच्या बागे-पर्यंत आलों होतों. तीच पुढें लालबागला येते. बसा आंत. हा डावेबाजूकडे जो पूल दिसत आहे तो करिरोड पूल होय. उजवे बाजूला 'मुरारजी गोकुळदास' नांवाची कापडाची गिरणी आहे. तीमध्यें सर्वतऱ्हेचें उत्तम कापड तयार होतें. पुढें गेल्यावर डावेबाजूला जी गल्ली दिसते त्या गल्लीनें आंत गेल्यास जी. आय्. पी. रेल्वेचें वर्कशॉप लागतें त्याला परळ वर्कशॉप म्हणतात. तेथें इंजिनें दुरुस्त करितात. हा पहा पोयबावडी नाका या ठिकाणीं डावेबाजूला एल्फिन्स्टनरोड व परळ स्टेशनास जाण्याचा रस्ता

आहे, उजवे बाजूला लहान मुलांचें हॉस्पिटल आहे. त्या हॉस्पिटलवरून पुढें गेलों तर बाळंतपणाचें वाडिया हास्पिटल आहे व त्याचेच समोरचे बाजूला किंग एडवर्ड मेमोरियल हॉस्पिटल आहे. वाडिया हॉस्पिटल जवळ परळ लॅबोरेटरी असून तेथें सर्पदंशावर उपचार करितात.

आतां आपण दादर ट्रॅम टर्मिनस जवळ आलों. याच्यापुढें ट्रॅम जात नाहीं. आतां उतरा व डावेबाजूकडे जो पूल दिसतो तिकडे चला. हा ' टिळक पूल ' होय. पुलावर गेल्यावर पुलाचे दोन फाटे होतात, त्यांपैकीं उजवे बाजूच्या रस्त्यानें चला. या दोन फाट्यांमध्यें जी जागा आहे तेथें एक बाग केलेली आहे. तेथें संध्याकाळीं पुष्कळ लोक फिरावयास येतात. या रस्त्यानें पुढें गेल्यावर ही पहा एक गिरणी दिसते. येथें लोकरीचें कापड विणतात. म्हणून तिला ' वुलन मिल ' म्हणतात. त्या वुलन मिल समोर ' शिवाजी पार्क ' आहे. ह्या रस्यावर माणसांची फार गर्दी नाहीं व आजूबाजूला घरेंही फारशीं नाहींत, पण नारळीच्या बागा फार आहेत या रस्त्यानें समोर गेल्यावर उजवे बाजूला हा पहा मोठा रस्ता लागतो तो लेडी हार्डिंज रोड होय. या रस्त्यानें आपण जाऊं. टिळक पुलापासून ज्या रस्त्यानें आपण आलों तो लेडी जमशेटजी रोड होय. हा पुढें माहीमपर्यंत गेला आहे. लेडी हार्डिंज रोडनें गेलें असतां बी. बी. रेल्वे लागते. हें त्या रेल्वेचें माटुंगा स्टेशन पहा. या स्टेशनजवळ डेव्हिडसासून रेफरमेटरी आहे. त्यामध्यें आडदांड चोरी वगैरे करणाऱ्या १८ वर्षांच्या आंतील मुलांस शिक्षा म्हणून ठेवतात. तेथें त्यांना उद्योग धंद्याचें, लिहिण्याचें व वाचण्याचें शिक्षण देतात. या माटुंगा स्टेशनावरून रेल्वे ओलांडून पुढें जाऊं. हा पहा पूल. यावरून आपण पलीकडे जाऊं. हा फार मोठा पूल आहे. खालीं जी. आय. पी. रेल्वेचें वर्क शॉप आहे. त्यास माटुंगा वर्कशाप म्हणतात. येथें आगगाडीचे डबे दुरुस्त करितात व नवीन बांधतात. या पुला-

वरून जातांना हें जी. आय. पी. रेल्वेचें माटुंगा स्टेशन लागतें. पुढें पूल उतरून समोर गेलें म्हणजे एक बाग लागते. त्याठिकाणीं पुष्कळ लोक फिरावयास जातात त्या ठिकाणास 'किंग्ज सर्कल' म्हणतात. आतां आपण थोडा वेळ बागेंत बसूं व नंतर दादरच्या ट्रॅमकडे जाणाऱ्या या समोरच्या रस्त्यानें जाऊन तेथें ट्रॅममध्यें बसून परत जाऊं.

---

# विशेष शब्दांच्या अर्थाची समजूत

( १ ) मुंबइ बेटाचे व्यवस्थेसाठीं ७ भाग केलेले आहेत त्या प्रत्येक भागास वार्ड म्हणतात.

वार्ड म्हणजे भाग ७ आहेत:—ए, बी, सी, डी, ई, एफ व जी.

( २ ) लहान वस्तीच्या ठिकाणास खेडें म्हणतात.

( ३ ) ज्या गांवांमध्यें पुष्कळ वस्ती असून व्यापाराची बरीच देवघेव व सरकारी कामही बरेंच चालतें त्या गांवास शहर म्हणतात.

( ४ ) मोठमोठ्या गांवीं तेथील स्वच्छता, आरोग्य व शिक्षण इत्यादि कामें करविण्यासाठीं लोकांच्या व सरकारच्या मतानें त्या त्या गांवांतील नियमित प्रमुख मंडळी नेमतात अशा संस्थेला म्युनिसिपालिटी म्हणतात.

( ५ ) सपाट व मोकळ्या जमिनीच्या मोठ्या भागास मैदान म्हणतात.

( ६ ) जमिनीच्या उंचवट्यास टेंकडी म्हणतात. ( हिला इंग्रजींत हिल असें ) म्हणतात.

( ७ ) टेंकडी फार मोठी असल्यास तिला डोंगर म्हणतात.

( ८ ) फार उंच व लांब पसरलेल्या डोंगरांच्या ओळींस पर्वत म्हणतात.

( ९ ) पर्वतावर त्याचाच जो भाग निमुळता होऊन उंच गेलेला असतो त्याला शिखर म्हणतात.

( १० ) शत्रूपासून रक्षण होण्याकरितां सभोंवतीं तट बांधून तयार केलेल्या जागेस किल्ला असें म्हणतात.

( ११ ) आगगाडी वगैरे जाण्यायेण्यासाठीं डोंगर किंवा पर्वत पोखरून जो रस्ता तयार करितात त्याला बोगदा म्हणतात.

( १२ ) एकाद्या लहानशा खोलगट व पसरट जागेंत जें पाणी सांचतें त्यास तळें म्हणतात.

( १३ ) तळें फार मोठें असून मुद्दाम बांधून काढिलेलें असेल तर त्यास तलाव म्हणतात.

( १४ ) सर्व बाजूंस जमीन असून मध्यें पाणी असतें त्यास सरोवर म्हणतात.

( १५ ) महासागराच्या भागास समुद्र किंवा सागर म्हणतात.

( १६ ) पाण्याच्या लहानशा प्रवाहास नाला म्हणतात

( १७ ) अनेक नाले मिळून होणाऱ्या पाण्याच्या प्रवाहास पऱ्ह्या किंवा ओढा म्हणतात.

( १८ ) डोंगर, पर्वत किंवा सरोवर यांपासून निघून उतार जमिनीकडे वाहात जाणाऱ्या गोड्या पाण्याच्या प्रवाहास नदी म्हणतात.

( १९ ) नदीच्या मुखांतून समुद्राच्या भरतीचें पाणी जेथपर्यंत वर जातें तेथपर्यंतच्या नदीच्या भागास खाडी म्हणतात.

( २० ) मीठ तयार करण्याचे जागेस मिठागर म्हणतात.

( २१ ) समुद्राचा चिंचोळा भाग जमिनीवर गेलेला असतो त्यास आखात म्हणतात.

( २२ ) आखात मोठें व रुंद असल्यास त्यास उपसागर म्हणतात.

( २३ ) गलबतें, आगबोटी इत्यादि लावण्यास सोईचें असें समुद्र किंवा खाडी यांच्या कांठचें जें ठिकाण त्यास बंदर म्हणतात.

( २४ ) समुद्रकिनाऱ्यास कांहीं बंदरीं आगबोटी, गलबतें इत्यादिकांस येथें बंदर आहे असें सुचविण्यासाठीं किंवा समुद्रांतील खडकापासून बचाव होण्यासाठीं खडकावर दिवा लावण्याकरितां जें घर बांधितात त्यास दीपगृह असें म्हणतात. ( यालाच लाईट हाऊस म्हणतात. )

( २५ ) आगबोटी सुरक्षित राखण्याकरितां, रंगविण्याकरितां, दुरुस्ती करण्याकरितां, माल चढविण्याकरितां व उतरण्याकरितां समुद्रकिनाऱ्यास धक्का वगैरे बांधून जी सोईची जागा केलेली असते तिला गोदी म्हणतात. ( हिला डॉक असेंही म्हणतात. )

( २६ ) सर्व बाजूनीं पाणी असून मध्यें जमीन असते तिला बेट म्हणतात ( याला द्वीप असेंही म्हणतात. )

( २७ ) तीन बाजूनीं पाणी असून चौथ्या बाजूनें दुसऱ्या जमिनीशीं जोडलेला जो जमिनीचा भाग त्यास द्वीपकल्प म्हणतात.

( २८ ) जमिनीचा चिंचोळा भाग पाण्यांत गेलेला असतो त्याला भूशिर म्हणतात. ( यालाच भूशलाका किंवा केप् म्हणतात. )

( २९ ) दोन जमिनीस जोडणाऱ्या जमिनीच्या अरुंद भागास संयोगभूमि म्हणतात.

( ३० दोन समुद्रांस जोडणारा जो पाण्याचा अरुंद भाग त्यास सामुद्रधुनी म्हणतात. ( हिला संयोगी जल असेंही म्हणतात)

( ३१ ) एका स्थळापासून दुसऱ्या स्थळापर्यंत जाण्या-येण्यासाठीं गाड्या वगैरे जाण्यायेण्यासारखा रुंद रस्ता तयार करितात त्यास सडक म्हणतात


( ३२ ) आगगाडी चालण्यासाठीं लोखंडाचे रूळ टाकून जो रस्ता तयार करितात त्याला आगगाडीचा रस्ता किंवा रेल्वे म्हणतात.

( ३३ ) नदीवरून किंवा रेल्वेच्या रस्त्यावरून पलीकडे जाण्यायेण्याकरितां जो मार्ग तयार करितात त्यास पूल म्हणतात. ( हा मार्ग लोखंडी, दगडी अगर लांकडी तयार करितात. )

( ३४ ) उतारू व माल चढण्या उतरण्याकरितां आगगाडी उभी करण्याचें जें ठिकाण त्यास स्टेशन म्हणतात.

( ३५ ) आगगाडीचे दोन किंवा अधिक फांटे एकत्र मिळ-णाऱ्या ठिकाणास जंक्शन म्हणतात.

विशेष शब्दांच्या अर्थांची समजूत.




REFBK-0005023